सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# शासकीय तंत्रनिकेतन, जळगांव

*राष्ट्रीय महामार्ग क्र.६,*
एसटीडी कोड क.०२५७ / २२२१७२१ फॅक्स कमांक २२२१७१९
E-mail-office.gpjalgaon@dtemaharashtra.gov.in

जा.क्र.शातंनिज/२०२६/ 2958 दिनांक : 10 FEB 2026

प्रति,
मा.प्राचार्य,
सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित/विनाअनुदानित,
अभियांत्रिकी, फार्मसी,एमबीए व एमसीए,
पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था
जळगांव जिल्हा जळगांव

## पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या स्मृती प्रित्यर्थ दिनांक ११ फेब्रुवारी रोजी आयोजित करावयाच्या व्याख्यानाबाबतची सुचना

आज दि ९ फेब्रुवारी रोजी माननीय जिल्हाधिकारी यांच्या कक्षात पंडित दीनदयाल उपाध्याय हिरक महोत्सव समितीची बैठक मा. निवासी उपजिल्हाधिकारी चव्हाण मॅडम यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.
या सभेत मा. निवासी उपजिल्हाधिकारी यांनी दिलेल्या आदेशानुसार जळगाव जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयांमध्ये पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या स्मृती प्रित्यर्थ ११ फेब्रुवारी रोजी आपल्या महाविद्यालयात व्याख्यानाचे आयोजन करावयाचे आहे.

सदर व्याख्यानात पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या विचारांची मांडणी, एकात्म मानववाद, त्यांचा जीवन प्रवास तसेच त्यांच्या विचारांच्या प्रेरणेतून सुरू करण्यात आलेल्या अंत्योदय योजनेचा तळागाळातील सर्व समाजातील घटकांना प्रसार करण्याबाबतचा संदेश देण्यात यावा. याप्रसंगी उपस्थित विद्यार्थ्यांना त्यांच्या जीवनपटाबद्दलची चित्रफीतही दाखवण्यात यावी.

आपल्या संस्थेत या व्याख्यानाचे आयोजन झाल्याचा फोटो, उपस्थित विद्यार्थी संख्या व आयोजित करण्यात आलेला कार्यक्रम याबाबत सविस्तर अहवाल शासकीय तंत्रनिकेतन जळगाव या संस्थेस दि ११ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत ssj_parag@yahoo.co.in या ई मेलवर पाठवण्यात यावा. जेणेकरून माननीय जिल्हाधिकारी यांना जळगाव जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयांचा एकत्रित अहवाल सादर करणे शक्य होईल. हि विनंती.

आपला विश्वासू

शासकीय तंत्रनिकेतन जळगांव

( डॉ.पराग मधुकर पाटील )
प्र. प्राचार्य,
शासकीय तंत्रनिकेतन जळगांव.
तथा समिती सदस्य पंडित दीनदयाल
उपाध्याय हिरक महोत्सव समिती.